मौजे अंबड खुर्द विभाग क्र. 4.2/4.5

**वरद लक्ष्मी**

**फ्लॅट नं.502, कार्पेट क्षेत्र 41.00 चौ.मी.**

सरकारी मुल्यांकनासाठी बांधीव क्षेत्र = कार्पेट क्षेत्र 41.00 चौ.मी. X 1.1 = 45.10 चौ.मी. X बाजारभाव रक्कम रु.40,150/-प्रति चौ.मी. परंतु सदरचा फ्लॅट पाचव्या मजल्यावर असल्याने 5% वाढ विचारात घेता रक्कम रु. 42,158/- प्रति चौ.मी. प्रमाणे

मुल्यांकन रक्कम रु. : 19,02,000/-

खरेदी किंमत रक्कम रु. : 19,10,000/-

स्टॅम्प रक्कम रु. : 1,14,600/-

नोंदणी फी रु. : 19,100/-

**फ्लॅट विक्री करारनामा**

फ्लॅट विक्री करारनामा आज दिनांक 22 माहे डिसेंबर इसवी सन 2025 रोज सोमवार ते दिवशी नाशिक मुक्कामी..

1. श्री. राजु कुमार

उ.वय-31वर्षे, धंदा- नोकरी

आधार नं. 5803 3023 2392

PAN- IHBPK4573C

2. मीनाक्षी कुमारी

उ.वय-24 वर्षे, धंदा- गृहिणी

आधार नं. 7728 7022 6909

PAN-

दोघेही रा.द्वारा- शेलेन्द्र प्रसाद सिंग,

गट नं. 20, प्लॉट नं. 30, संजीव नगर,

अंबड लिंक रोड, नाशिक-10

लिहुन घेणार

**::यांसी::**

वरद इन्फ्रा भागीदारी फर्म तर्फे भागीदार

PAN- AAXFV3122H

1. श्री. रतन विठोबा दातीर

उ.वय:48 वर्षे, धंदा- बिल्डर

आधार नं.3088 0939 0414

PAN- APHPD9501R

2. श्री. दिवेश सुरेश पाटील

उ.वय: 29 वर्षे, धंदा- बिल्डर

आधार नं.8222 0758 6740

PAN-DIUPP4491P

लिहुन देणार

3. श्री. उत्तम विठोबा दातीर

उ.वय: 51 वर्षे, धंदा- व्यापार

नं.1 व 3 रा.घर नं. 421/469 कृष्णाकुंज बंगला,

दातीर मळा, कृष्णा नगर, यशवंत मार्केटचे

मागे, अंबड, नाशिक-422010

आधार नं.6981 3191 0985

PAN- APHPD9502N

4. सौ. सुरेखा सुरेश धामणे

उ.वय: 53 वर्षे, धंदा- गृहीणी/बिल्डर

आधार नं.9897 7525 4643

PAN- BBTPD0762P

नं. 2 व 4 रा. प्लॉट नं.11, दगडी बंगला, संजीवनी हॉस्पीटल मागे, बंदावणे नगर, कामटवाडे, नाशिक-422008 — लिहुन देणार

कारणे विक्री करारनामा लिहुन देतात ते ऐसा जे की,

1. मिळकतीचे वर्णन :- अ. तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे अंबड खुर्द या गावचे शिवारातील सर्व्हे नं.231/2ब/232/1/3/7अ या मिळकतीचे अंतिम मंजुर ले-आऊट मधील बिनशेती प्लॉट नं.03 यांसी क्षेत्र 362.00 चौ.मी. यांसी चतु:सिमा खालीप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | 9 मीटर रुंदीचा रस्ता व लागु सर्व्हे नं. 231/3 |
| पश्चिमेस | - | याच ले-आऊट मधील प्लॉट नं.02 |
| दक्षिणेस | - | याच ले-आऊट मधील प्लॉट नं.04 |
| उत्तरेस | - | लागु सर्व्हे नं. 231/1 |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील बिनशेती प्लॉट मिळकत जल,तरु,काष्ट,पाषाण निधी, निक्षेप, तदंभुत वस्तुसहीत आणि लिहुन देणार यांना प्राप्त असलेल्या वागवहिवाटीचे, कॉलनीरोड, ओपनस्पेस सामाईकरित्या वापरण्याचे सर्व हक्कांसहची तसेच त्यात असलेल्या झाडझाडोरा व इजमेंटरी राईटसह दरोबस्त मिळकत.

ब. वर कलम 1 अ यांत वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवरील **वरद लक्ष्मी** या बांधकाम सुरू असलेल्या इमारतीतील **पाचव्या** मजल्यावरील **फ्लॅट नं. 502** यातील एक बेड+हॉल+किचन+दोन बाल्कनी यांसी एकुण कार्पेट क्षेत्र 41.00 चौ.मी. यांसी चतु:सिमा पुढीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | लिफ्ट व फ्लॅट नं. 503 |
| पश्चिमेस | - | मार्जिनल स्पेस व प्लॉट नं. 2 |

दक्षिणेस - फ्लॅट नं. 501

उत्तरेस - मार्जिनल स्पेस व सर्व्हे नं. 231/1

येणेप्रमाणे चतु:सिमेतील फ्लॅट मिळकत या मिळकतीमध्ये जाण्यायेण्याचे वागवहिवाटीचे व इमारतीमधील सामाईक सोई सुविधा वापरण्याचे हक्कांसह तसेच सामाईक कॉलनी रस्ते व ओपन स्पेस वापरण्याचे हक्कांसह मिळकत दरोबस्त.

या दस्तात लिहुन घेणार यांचा उल्लेख तुम्ही व लिहुन देणार भागीदारी फर्मचा उल्लेख आम्ही व कलम 1ब मध्ये वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीचा उल्लेख सदर मिळकत असा संक्षिप्तात केला आहे..

1. मौजे अंबड खुर्द येथील सर्व्हे नं.232/1 ही मिळकत शोभा चंद्रकांत पिंगळे व श्री. संजय पुंडलिक घरटे, सर्व्हे नं.232/2 व सर्व्हे नं.232/3 हया मिळकती श्री. चंद्रकांत रामदास पिंगळे व शोभा चंद्रकांत पिंगळे तसेच सर्व्हे नं. 232/7 ही मिळकत श्री. दिपक निवृत्ती दातीर यांचे मालकीची होती. सदर मिळकत मालकांनी सदर मिळकतींचा एकत्रित ले-आऊट प्लॅन तयार केला व त्यामध्ये एकुण प्लॉट नं.1 ते 32 तयार केले.
2. सदर प्लॉट नं.1 ते 32 चे श्री. चंद्रकांत रामदास पिंगळे, शोभा चंद्रकांत पिंगळे व श्री. संजय पुंडलिक घरटे व श्री. दिपक निवृत्ती दातीर यांनी आपसात वाटप केले. सदरचे वाटपपत्र मे. दुय्यम निबंधक, नाशिक यांचे कार्यालयात दस्त नं.4910/2023 दि.01/07/2023 रोजी नोंदविलेले आहे. त्यानुसार प्लॉट नं.2 ते 29 व 32 या प्लॉट मिळकती श्री. चंद्रकांत रामदास पिंगळे व शोभा चंद्रकांत पिंगळे यांचे वाटणीस आलेल्या आहेत व प्लॉट नं.30 व 31 या प्लॉट मिळकती श्री. दिपक निवृत्ती दातीर यांचे वाटणीस दिलेल्या होत्या व श्री. संजय पुंडलिक घरटे यांचे मालकीचे क्षेत्र अंतिम मंजुर ले- आऊट करते समयी डीपी रोड व कॉलनी रोडसाठी संपादित झालेले असल्याने ले- आऊटमधील कोणतेही प्लॉटेड क्षेत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. सदरचे वाटपपत्रानुसार सदर मिळकतींचे रेकॉर्डला नोंद नं. 15679 मंजुर झालेली आहे. त्याप्रमाणे कलम 1अ मध्ये वर्णन केलेली प्लॉट मिळकत श्री. चंद्रकांत रामदास पिंगळे व शोभा चंद्रकांत पिंगळे यांचे वाटणीस आलेली होती. त्या हक्क व अधिकारात त्यांनी सदर मिळकत लिहुन देणार यांना विक्री केलेली आहे. वर कलम 1अ यात वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही आम्ही श्री. चंद्रकांत रामदास पिंगळे व शोभा चंद्रकांत पिंगळे यांचेकडुन दि.04/09/2023 रोजी कायम फरोक्त खरेदीखतान्वये विकत घेतलेली

आहे. सदरचा दस्त मे. दुय्यम निबंधक नाशिक-5 यांचे कार्यालयात अ.नं.11117/2023,दि.05/09/2023 अन्वये नोंदलेला आहे. त्यानुसार सदर प्लॉट मिळकतीचे रेकॉर्डला आमची नावे नोंद नं. 15797 अन्वये लागलेली आहेत. तेव्हापासुन सदर मिळकत आमचे कब्जे वहिवाटीत होती व आहे. येणेप्रमाणे आम्हाला सदर मिळकत विकसीत करुन त्यावरील बांधकाम विक्री करण्याचा हक्क व अधिकार आहे.

3. सदर प्लॉट मिळकतींवर बांधकाम करण्यासाठी आम्ही बिल्डींग प्लॅन तयार करुन तो नाशिक महानगरपालिका यांचेकडून त्यांचे कमेंन्समेंट सर्टिफिकेट नं.एनएमसीबी/बी/2025/एपीएल/21332,दि.17/09/2025 अन्वये मंजुर करुन घेतलेला आहे व त्याप्रमाणे कलम 1 ब मध्ये वर्णन केलेल्या **वरद लक्ष्मी** या नावाने सदर इमारतीचे तळ मजला पार्किंग+ सहा मजले असे बांधकामाचे स्वरुप असलेल्या इमारतीचे बांधकाम सुरु केलेले असुन प्रगती पथावर आहे. त्यातील कलम 1ब मध्ये वर्णन केलेली फ्लॅट मिळकत आहे.
4. सदर प्लॉट मिळकत मंजुर ले आऊट मधील असून सदर संपुर्ण सर्व्हे मिळकतीचा ले आऊट मे. उप संचालक, नगररचना, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.जा. नं./ननवि /अंतिम/15/2023, दि.09/06/2023 अन्वये अंतिमरीत्या मंजुर केलेला आहे.
5. सदर सर्व्हे नं. 231/2, सर्व्हे नं.232/1, सर्व्हे नं.232/3 आणि सर्व्हे नं. 232/7 या मिळकतीचे क्षेत्राचा रहिवासी बिनशेती वापर करणेकामी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 चे 42-ब प्रमाणे मा. तहसिलदार सो. नाशिक यांचेकडील क्र. आस्था-1/42-ब/एसआर/226/2022 दि.25/08/2022 प्रमाणे अकृषिक रुपांतर नोटीस आणि यांचेकडील क्र. आस्था-1/42-ब/एसआर/ 226/2022 दि.30/08/2022 प्रमाणे रहिवासी अकृषिक वापराची सनद मिळकत मालकांना प्राप्त झालेली होती व आहे. येणेप्रमाणे सदर प्लॉट मिळकत ही बिनशेतीकडे वर्ग झालेली आहे.
6. तुम्ही मागणी केल्याप्रमाणे आम्ही तुम्हांस आमचे सदर प्लॉट मिळकतीचे मालकीचे कागदपत्र-7/12,नोंदीचा उतारा,तसेच प्लॉटचे खरेदीखत, जनरल मुखत्यारपत्र, मंजुर बिल्डींग प्लॅन, बिनशेती परवानगी इत्यादी कागदपत्राची तपासणी करण्यास दिले व त्यांची तपासणी तुम्ही केलेली आहे व त्यानुसार तुम्हांस विक्री करावयाच्या सदर फ्लॅट मिळकतीचे चटई क्षेत्राची तुम्ही खातरजमा करुन खात्री करुन घेतली आहे व चटई क्षेत्र विचारात घेऊनच सदर फ्लॅट मिळकतीचा विक्री व्यवहार तुमचेबरोबर केला आहे. तसेच कलम 1 ब

मध्ये नमुद केलेल्या फ्लॅट मिळकतीचा कब्जा तुम्हास दिल्यानंतर आम्ही विक्री करत असलेल्या कार्पेट क्षेत्राची खातरजमा तुम्ही करून घ्यावयाची आहे. मात्र सदरचे क्षेत्र हे 3 टक्के पावेतो कमी किंवा जास्त होवु शकते. त्याबाबतची कुठलीही तक्रार किंवा वाद तुम्हास उपस्थित करता येणार नाही.

7. वर कलम 1ब मध्ये वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीची किंमत तुमचे व आमचे दरम्यान रक्कम रु.19,10,000/-(अक्षरी रक्कम रु. एकोणविस लाख दहा हजार मात्र) इतकी ठरली आहे. सदरची किंमत आजचे बाजारभावाप्रमाणे योग्य व बरोबर आहे. किंमतीबाबत उभयतांमध्ये कुठलीही तक्रार नाही. सदर रक्कमेपैकी तुम्ही आम्हाला खालील तपशिलाप्रमाणे भरणा रक्कम रु.0,00,000/-(अक्षरी रक्कम रु.----- लाख मात्र) दिलेली आहे.

**भरणा तपशिल**

| रक्कम | तपशिल |
|---|---|
| 00,000/- | अक्षरी रक्कम रु. ------- मात्र लिहुन घेणारपैकी नं. 1 यांनी त्यांचे खाते असलेल्या --------, शाखा-------, नाशिक या बँकेतुन ---------,दि. / /2025 अन्वये लिहुन देणार यांचे खाते असलेल्या आयसीआयसीआय बँक लि. शाखा- अंबड लिंक रोड, नाशिक या बँकेत वर्ग केले. सबब लिहुन घेणार यांचेकडुन लिहुन देणार यांना मिळाले. |
| 0,00,000/- | एकुण अक्षरी रक्कम रु.----- मात्रचा भरणा लिहुन देणार यांना मिळाला. भरणा पावला.भरण्याबाबत आमची तक्रार नाही. |

8. उर्वरीत रक्कम रु.00,00,000/-(अक्षरी रक्कम रु. -------- मात्र) तुम्ही आम्हाला दोन महिन्याचे मुदतीत कोणत्याही वित्तीय संस्थेकडील /बँकेकडील कर्ज प्रकरणातून किंवा रोख स्वरुपात दयावयाचे आहे. सदर बाब ही या कराराची मुख्य शर्त आहे. वर नमुद केल्याप्रमाणे रक्कम तुम्ही मुदतीत न दिल्यास सदर रक्कमेवर तुम्हांस द.सा.द.शे.18% व्याज दयावे लागेल. सदर कर्ज प्रकरणाचे कामी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी तुम्हांस आम्ही योग्य ते सहकार्य करु. परंतु सदर कर्ज प्रकरण मंजुर करुन घेणेची

संपुर्ण जबाबदारी तुमची राहील. यदाकदाचित सदरचे कर्ज प्रकरण मंजुर न झाल्यास वर नमुद केल्याप्रमाणे उर्वरीत रक्कम ठरलेल्या मुदतीत तुम्ही आम्हाला अदा करावयाची आहे.

9. तुम्हाला या करारनाम्याने दिलेली फ्लॅट मिळकत ही संपुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची अशी आहे. सदर फ्लॅट मिळकत आम्ही कोठेही गहाण, दान,लिन,लिज, करार, साठेखत,बक्षिसपत्र, जामिनकी, तारण वगैरे जडजोखमीत गुंतविलेली नाही अगर तिचेवर बोजे निर्माण केलेले नाहीत आणि या उपरही तसे काही निघाल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदरखर्चाने करुन देवु.

10. सदर फ्लॅट मिळकतीकरीता लागणारे वीज कनेक्शन व वीज मिटर तसेच पाणी पुरवठा याकरीता महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लि. व नाशिक महानगरपालिका यांचेकडे भरावी लागणारी रक्कम तसेच सदर फ्लॅट मिळकतीचे करार रक्कमेवर भरावा लागणारा जी.एस.टी.इत्यादी कर भरण्याची जबाबदारी लिहुन देणार यांचेवर राहील.

11. आम्हाला तुमचेकडुन सदर फ्लॅटची संपुर्ण मोबदला रक्कम मिळाल्यानंतर व सदर इमारतीचा बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर आम्ही तुम्हांस वर कलम 1ब यात वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीचा खुला व निर्वेध कब्जा देऊ व सदर कराराप्रमाणे सदर मिळकतीचे डिड ऑफ अपार्टमेंट तुमचे लाभात, सदर इमारतीमधील फ्लॅट धारकांची अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन स्थापन करुन दिल्यानंतर, लिहुन व नोंदवुन देऊ.

12. आम्ही सदर इमारतीमधील फलॅटधारकांची महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट 1963 चे कलम 4 अन्वये किंवा अपार्टमेंट ओनरशिप अक्ट 1970 या कायदयाचे तरतुदीनुसार अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन अथवा सहकारी संस्थेची स्थापना करु, त्याचे सभासद होण्याचे तुम्ही मान्य व कबुल केले आहे.

13. सदर असोसिएशन / संस्थेचे होणारे नियम,पोटनियम, तसेच स्थानिक संस्था अथवा सरकाने घालुन दिलेले नियम,पोट नियम अथवा यापुढे अंमलात येणारे नियम,पोटनियम याचे पुर्णपणे पालन सोसायटी किंवा असोसिएशन स्थापन होताना केले जाणारे नियम,पोट नियम याचे पालन तुम्ही कराल, असे आश्वासन तुम्ही दिले आहे.तसेच सोसायटी/ असोसिएशन अथवा कंपनी स्थापन होतांना केले जाणारे नियम, पोटनियम यांचे पालन तुम्ही कराल असे आश्वासन तुम्ही आम्हांस दिले आहे.

14. सदर इमारतीमधील फ्लॅट बाबत जे जे दस्त लिहुन देणार हे त्यांचे सहया, अंगठे करुन लिहुन देतील ते ते सर्व दस्त जसे विक्री करारनामा, डिड ऑफ अपार्टमेंट, घोषणापत्र इत्यादी नोंदविण्यासाठी लिहुन देणारांपैकी नं.1,3 व 4 यांनी लिहुन देणार नं.2 यांना दि.

10/10/2025 रोजी विशेष मुखत्यार पत्रान्वये हक्क व अधिकार दिलेले आहे. सदर दस्त मे. दुय्यम निबंधक, नाशिक-3 यांचे कार्यालयात अ.नं.12198/2025 ला दि.10/10/2025 रोजी नोंदविलेला आहे.

15. तुम्हांस सदर फ्लॅट मिळकतींसाठी तळ मजल्यावील सामाईक पार्किंगची व्यवस्था करण्यात येईल. त्याबाबतचा स्थानदर्शक नकाशा या दस्तासोबत जोडला आहे. सदर फ्लॅट मिळकतीचे सरकारी कर,महानगरपालिका टॅक्स, पाणी पट्टी सामाईक लाईट बिल, लिफटचा मेटेनन्स इत्यादी सर्व खर्च हा तुमचे तुम्ही करावयाचा व सोसावयाचा आहे. त्याचेशी आमचा काहीएक संबंध राहणार नाही.

16. तुम्हांस खरेदी दयावयाचे जागेचा उपयोग तुम्ही फक्त रहिवासी कामासाठीच करावयाचा असून इमारतीतील अन्य बांधकाम धारक यांना त्रास होईल, अशा रितीने वापर करावयाचा नाही.

17. प्रस्तुतचा करारनामा तसेच यापुढील अपार्टमेंट डिड, डिक्लेरेशन डिड याकामी येणारा खर्च जसे स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी, वकील फी, व अन्य तत्सम खर्च हा सर्वस्वी लिहुन देणार यांनी करावयाचा व सोसावयाचा आहे. त्याचेशी तुमचा कोणताही संबंध नाही.

18. उपरोक्त मिळकतीची संपुर्ण किंमत ही तुम्ही आम्हाला अदा केल्याशिवाय प्रस्तुतचे करारान्वये तुम्हाला प्राप्त झालेले हक्क हे अन्य कोणासही तबदिल करता येणार नाहीत किंवा सदर मिळकतीचा कब्जा अन्य कोणासही हस्तांतर करणेचा तुम्हांस हक्क व अधिकार राहणार नाही.

तुम्हांस देण्यात येणाऱ्या फ्लॅटमधील सोयी सुविधा हया परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या आहेत.त्या व्याक्तिरीक्त अन्य जादा सुख सुविधांची तुम्हाला आवश्यकता असल्यास त्याकामी त्याचा वेगळा मोबदला तुम्ही आम्हाला दयावयाचा आहे.

**परिशिष्ट- अ**

तुम्हांस खरेदी दयावयाच्या फ्लॅट मिळकतीमधील व त्यासाठी सुखसुविधा खालीलप्रमाणे-

1. आर.सी.सी.फ्रेम स्ट्रक्चर.

2. बाहेरील भिंती विटाच्या 6 इंच जाडीच्या व आतील भिंती 4 इंच जाडीच्या.
3. बाहेरील प्लॅस्टर -सॅण्ड फेस प्लॅस्टर डबल कोट व आतील प्लॅस्टर-सॅण्ड फेस व त्यावर नेरु प्लॅस्टर असेल.
4. फ्लोरिंग- 48X 24 स्पार्टेक्स व्हेट्रीफाईड टाईल्समध्ये.
5. वॉल टाईल्स-फुल टाईल्स 300x450 मीमी अॅटॅच टॉयलेट व कॉमन टॉयलेट 7 फुट पर्यंत टाईल्स व किचन -ओटयाला स्लॅब बॉटम पर्यंत.
6. चौकट-मुख्य दरवाजा लाकडी व उर्वरीत ग्रेनाईट चौकटी.
7. खिडक्या -एमएस ग्रिलमध्ये बाहेरुन व सर्व खिडक्या थ्री ट्रॅक+मॉस्किटोनेट फिटींग, अल्युमिनियम स्लाईडिंग टाईप.
8. इलेक्ट्रिक फिटींग-कन्सील्ड टाईप व योग्य असे पॉईटस प्रत्येक रुममध्ये + संपुर्ण फ्लॅटसाठी एक इन्व्हर्टर पॉईट, फिटींगसह.
9. नळ फिटींग -कन्सिल्ड योग्य त्या फिटींगसह.
10. रंगकाम-आतुन कलर इमलशन कलर व बाहेरुन ए.सी.ई. व खिडक्या ग्रिल यांना ऑईलपेंट.
11. संपुर्ण इमारतीसाठी टेरसवर व ग्राऊंडखाली वाटर टँक सामाईक वापरासाठी.
12. कंपाऊंड वॉल 4 फुट उंचीची गेटसह सामाईक वापरासाठी.
13. सर्व फ्लॅट्स साठी तळमजल्यावरील मोटार सायकल/कारसाठी सामाईक पार्किंचा वापर करावयाचा आहे.
14. बोअरवेलचा वापर सर्वांसाठी-इमारतीसाठी सामाईक वापरासाठी.
15. कॉमन लिफ्ट सर्वांचे सामाईक वापरासाठी.
16. इमारतीच्या सामाईक लाईट्स, लिफ्ट, इ. साठी टेरसवर सोलार सिस्टम.

येणेप्रमाणे सदरचा विक्री करारनामा आज रोजी आम्ही तुमचे लाभात मान्य व कबुल करुन राजीखुशीने, स्वसंतोषाने समजुन,उमजून घेवून कोणाचाही धाक दडपणास बळी न पडता साक्षीदारासमक्ष सहया करुन लिहून व नोंदवुन दिला असे.

हा फ्लॅट विक्री करारनामा.

नाशिक.

ता.म.

…………………………..

1. श्री. राजु कुमार

……………………………

2. मीनाक्षी कुमारी

लिहुन घेणार

वरद इन्फ्रा भागीदारी फर्म तर्फे भागीदार

.....................................

1. श्री. रतन विठोबा दातीर

..................................

2. श्री. दिवेश सुरेश पाटील

...............................

3. श्री. उत्तम विठोबा दातीर

........................................

4. सौ. सुरेखा सुरेश धामणे

लिहुन देणार

साक्षीदार-

1............................... 2. ...............................


12